# 16 डिसेंबर

## आजचा सुविचार :

**परीक्षा म्हणजे स्वत:च्या आत डोकावून पाहण्याची संधी असते.**

## आजचे पंचांग :

वार – गुरुवार
दिनांक : 16 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – भरणी
सुर्योदय – सकाळी 7.06 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 02 वाजता

## आजचे दिनविशेष :

1497: वास्को-द-गामाने केप ऑफ गुड होपला वळसा घातला.

1954: भारतातील पहिल्या इंजिनीअरिंग कॉलेजची स्थापना पुणे येथे झाली.

1928: मुंबई-पुणे रेल्वे वाहतूक बोगद्यातून सुरु झाली.

1971: पाकिस्तानने भारताविरुद्धच्या युद्धात शरणागती पत्करली.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Land – जमीन 2) Earth - पृथ्वी 3) Planet – ग्रह 4) Star – चांदणी

## आजची प्रश्नमंजुषा :

1) मुख्य दिशा किती व कोणत्या आहेत?
2) सामान्यत: एका वर्षात किती दिवस असतात?
3) सरपटणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.
4) “ पाण्यामध्ये साखर विरघळते” हा बदल मूळस्वरूपात येईल का?

## बोधकथा :

### बासरीवाला मुलगा आणि गावकरी

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट. एका गावात उंदरांचा फार सुळसुळाट झाला होता. घरात, दुकानात, शेतात नुसते उंदीरच उंदीर. त्यामुळे अन्नाचे नुकसान होत होते. कोणत्याही परिस्थितीत उंदरांचा नाश करायचा असे गावकरी ठरवतात.पणअनेक उपाय करूनही उंदरांचा नाश होत नाही.ही गोष्ट शेजारच्या गावातील एका बासरीवाल्याला कळते. तो या गावात येतो व गावकऱ्यांना सांगतो, की मी या उंदराचा बंदोबस्त करतो. तुम्ही मला त्या बदल्यात शंभर सुवर्णमुद्रा द्या. गावकरी तयार होतात. मग तो बासरीवाला बासरी वाजवत गावात हिंडू लागतो. त्याच्या बासरीच्या सुरामुळे सर्व उंदीर त्याच्याकडे आकर्षित होतात. व त्याच्यामागे धावू लागतात. तो तसाच नदीत जातो. त्याच्याबरोबर उंदीरही पाण्यात जातात. आणि पाण्यात बुडून मरतात.. बासरीवाला गावकऱ्यांना आपली बिदागी मागतो. मात्र, गावकरी शंभर सुवर्णमुद्रा द्यायला नकार देतात. बासरीवाल्याला गावकऱ्यांची लबाडी कळून येते.तो म्हणतो ठिक आहे, आता मी तुम्हाला कशी अद्दल घडवतो ते पहा. तो पुन्हा बासरी वाजवत गावात फिरू लागतो. या वेळी त्याच्या बासरीचे सूर ऐकून लहान मुले त्याच्याकडे आकर्षली जातात. ती त्याच्या मागे धावू लागतात. गावकऱ्यांना भीती वाटते की उंदराप्रमाणे तो आपल्या मुलांनाही नदीत नेऊन बुडवेल. त्यामुळे गावकरी त्याला थांबवून शंभर सुवर्णमुद्रा देतात.

तात्पर्य : उपकार करणाऱ्याशी कृतघ्न वागू नये.